# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर**

**५३९ कसबा करवीर राजेंद्र नगर कोल्हापूर- ४१६ ००४**

website : **www.sscboardkolhapur.in** & www.mahahsscboard.gov.in,Phones:Chairman 2690829 [O] 2690679 [R], Secretary 2691405 [O] 2656044 [R]. PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758

**E-Mail: divsec.kop@ gmail.com**


जा.क्रं./कोविमं/इ.१२ वी /गोपनीय/ 640
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
दि.२६/०७/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सन- २०२१ सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत.
संदर्भ - रा.मं.पत्र क्रं. /परीक्षा-२/ ४३१९ /पुणे-४ दि.२५/०७/२०२१ अन्वये.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सन- २०२१ सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार विद्यार्थीनिहाय गुण नोंदणी करण्यासाठी मंडळामार्फत प्रथमच संगणकीय प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

सदर प्रणाली मध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थीनिहाय गुणाची नोंद करताना काही त्रुटी/चुका राहिलेल्या आहेत. त्या त्रुटी/चुका दुरुस्त करण्यासाठी संबंधीत शाळांचे जबाबदार प्रतिनिधी/प्राचार्यांनी मंगळवार दिनांक-२७/०७/२०२१ रोजी न चुकता मंडळ कार्यालयामध्ये हजर रहावे. व सोबत जोडलेल्या पत्रानुसार त्रुटींची दुरुस्ती मंडळ स्तरावर करण्यात येईल.

त्रुटी पूर्तता करण्यासाठी विभागीय मंडळात येते वेळी शाळांनी वितरण केंद्रांवर जमा करावयाचे निकालपत्रकाचे पाकिट विभागीय मंडळात घेऊन यावे. जर निकालापत्रकाची हॉर्ड कॉपी वितरण केंद्रावर जमा केली असेल तर आपलेकडील असलेली हॉर्ड कॉपी छायाप्रती सह मंडळामध्ये घेवून यावे. आपणाकडे स्थळप्रत नसेल तर निकाल दुरुस्त करण्यात येणार नाही. त्रुटी प्रस्तावाच्या दुरुस्तीसाठी उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविदयालयातील प्रतिनिधी उपस्थित न झाल्यास संबंधीत विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सहपत्र - रा.मं. /परीक्षा-२/४३१९/ पुणे-४ दि.२५/०७/२०२१ सोबत जोडलेले आहे.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-२/४३१९
पुणे - ४११००४
दिनांक २५/०७/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय -उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१- सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत..**

**संदर्भ- १.या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/३८९१, दि.५/७/२०२१ रोजीचे पत्र.**
**२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/४३२१ , दि.२५ /७/२०२१ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१- सुधारित मूल्यमापन कार्यपध्दती संदर्भात तपशिलवार सूचना सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये व विभागीय मंडळांना संदर्भिय पत्रासोबतच्या परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थीनिहाय गुण नोंदणी करण्यासाठी मंडळामार्फत प्रथमच संगणकीय प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर प्रणालीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद करताना काही त्रुटी/चुका राहिल्या असल्यास त्या त्रुटी/चुका दुरूस्त करण्यासाठी विभागीय मंडळांनी तालुका/जिल्हानिहाय वेळापत्रक निश्चित करावे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडील मूळ अभिलेख पाहून विभागीय मंडळ स्तरावर दुरूस्ती करावी. याबाबत करावयाची कार्यवाही पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संगणक प्रणालीमध्ये माहिती भरताना राहिलेल्या त्रुटी/चुका | उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालय/विभागीय मंडळ स्तरावर करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १. | संगणक प्रणालीमध्ये विहित मुदतीत काही विद्यार्थ्यांचे पूर्णतः गुण भरलेले नाहीत. | १) या विद्यार्थ्यांची संपादणूक/गैरहजेरी/अन्य बाबी याचे निश्चितीकरण करावे. अशा विद्यार्थ्यांचे शासन निर्णयानुसार यापूर्वी मूल्यमापन झालेले आहे तथापि संपादणूक भरली गेली नसल्यास ती उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडील संबंधित मूळ अभिलेख पाहून विषयनिहाय गुणांची संपादणूक निश्चित करावी.<br>२) संबंधित अभिलेखाच्या छायाप्रती मूळ अभिलेख पाहणाऱ्या मंडळ अधिकाऱ्याने प्रमाणित करावी व त्याची प्रत विभागीय मंडळात जतन करून ठेवावी.<br>३) विद्यार्थीनिहाय व विषयनिहाय गैरहजेरी/सूट/प्राप्त होणारे गुण प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्यावयात. |

| | | |
|---|---|---|
| २. | विद्यार्थीनिहाय गुण भरले. मात्र निश्चित (Confirm)केले नाहीत. | १) सदर विद्यार्थ्यांचे संगणकीय प्रणालीत भरण्यात आलेले गुण अंतिम समजून मंडळ स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>२) तथापि सदर गुणांबाबत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे काही म्हणणे असल्यास उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालयांकडील संबंधित मूळ अभिलेख पाहून विषयनिहाय गुणांची/श्रेणींची निश्चिती करावी.<br>३) संबंधित अभिलेखाच्या छायाप्रती मूळ अभिलेख पाहणाऱ्या मंडळ अधिकाऱ्याने प्रमाणित करावी व त्याची प्रत विभागीय मंडळात जतन करून ठेवावी.<br>४) गुण/श्रेणीमध्ये बदल असल्यास त्याबाबत प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |
| ३. | विद्यार्थीनिहाय गुण भरले, निश्चित केले पण चुका झालेल्या आहेत. | १) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडील संबंधित मूळ अभिलेख पाहून विषयनिहाय गुणांची/श्रेणींची निश्चिती करावी.<br>२) संबंधित अभिलेखाच्या छायाप्रती मूळ अभिलेख पाहणाऱ्या मंडळ अधिकाऱ्याने प्रमाणित करावी व त्याची प्रत विभागीय मंडळात जतन करून ठेवावी.<br>३) गुण/श्रेणीमध्ये बदल असल्यास त्याबाबत प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |
| ४. | विद्यार्थ्यांचे एखादया विषयाचे/भागाचे गुण/श्रेणी भरलेले नाहीत. | १) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विहित नमून्यातील परिशिष्टे सिलबंद पाकीटात विभागीय मंडळाकडे जमा केलेली आहेत.<br>२) संबंधित उच्च माध्यमिक शाळेचे सिलबंद पाकीट संबंधित लिपिक, शाखाप्रमुख, शाखाधिकारी, सहा.सचिव/सहसचिव यांच्या स्वाक्षरीने उघडून संबंधित परिशिष्टावरून सदर गुण/श्रेणींचे निश्चितीकरण करावे.<br>३) संबंधीत विषयाचे गुण/श्रेणी प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |
| ५. | पुनर्परिक्षार्थींच्या बाबतीत श्रेणी विषयाची श्रेणी दर्शवितांना सध्याच्या एक श्रेणी विषयांव्यतिरिक्त विद्यार्थ्याचे जुने श्रेणी विषय असल्यास १,२,३,५, N श्रेणी दर्शविण्यात आलेली आहे. | १) अशा विद्यार्थ्यांच्या प्रकरणात उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा पत्रव्यवहार/ म्हणणे विचारात घ्यावे.<br>२) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी दिलेल्या माहितीची खातरजमा करून बदलाबाबत प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात.<br>३) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या श्रेणी कोणतीही दर्शविली असली तरी, मागील परीक्षेची उपलब्ध श्रेणी विचारात घेवून त्यात उत्तीर्ण असल्यास ४ श्रेणी (सूट) दर्शविली जावी. उर्वरित प्रकरणात उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा दर्शविलेली श्रेणी अंतिम केली जाईल. |
| ६. | संगणक प्रणालीत उपलब्ध नसलेल्या अतिरिक्त बैठक क्रमांकाच्या विद्यार्थ्यांच्या गुण / श्रेणीबाबत कार्यवाही. | १) ऑनलाईन आवेदनपत्र भरुनही बैठक क्रमांक न मिळालेले परीक्षार्थी, न्यायलयीन प्रकरणे/ राज्यमंडळाच्या लिखित निर्देशानुसार ऑफलाईन आवेदनपत्र प्राप्त करुन घेतलेले खाजगी विद्यार्थी यापैकी ज्यांना मा. विभागीय अध्यक्षांच्या मान्यतेने अतिरिक्त बैठक क्रमांक देण्यात आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांबाबतच त्यांचे गुण/श्रेणी सिलबंद पाकीटातील संबंधित परिशिष्टानुसार निश्चित करण्यात यावेत.<br>२) अशा विद्यार्थ्यांच्या सर्व माहितीसह गुण/श्रेणी प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| ७. | विद्यार्थी प्रविष्ठ प्रकार चुकलेली प्रकरणे-१.नियमित२. पुनर्परीक्षार्थी ३. खाजगी ४. तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे विद्यार्थी | १) अशा विद्यार्थ्यांच्या प्रकरणात उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा पत्रव्यवहार/ म्हणणे विचारात घ्यावे.<br>२) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा दिलेल्या माहितीची खातरजमा करावी तसेच विभागीय मंडळ स्तरावरही पडताळणी करून अशी प्रकरणे निश्चित करावीत.<br>३) पडताळणीनंतर दुरूस्ती असलेल्या प्रकरणांबाबत प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |
| ८. | विद्यार्थ्यांना विषयास सूट असताना प्रविष्ट दाखविणे/प्रविष्ट असताना सूट दाखविणे. | १) अशा विद्यार्थ्यांच्या प्रकरणात उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा पत्रव्यवहार/ म्हणणे विचारात घ्यावे.<br>२) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा दिलेल्या माहितीची खातरजमा करावी तसेच विभागीय मंडळ स्तरावरही पडताळणी करून अशी प्रकरणे निश्चित करावीत.<br>३) पडताळणीनंतर दुरूस्ती असलेल्या प्रकरणांबाबत प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |
| ९. | ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल तयार करणे- | १ अशा विद्यार्थ्यांचा निकाल तयार करण्यासंदर्भात स्वतंत्र सूचना या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.<br>२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एस.डी.२, दि. २७ सप्टेंबर २०१८ मधील मुद्या क्र. १० नुसार अशा विद्यार्थ्यांचे प्रथम नियमित विद्यार्थी/पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी यासंदर्भाचे निश्चितीकरण करावे.<br>३. अ. ITI पूर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत भाषा विषयांसाठी खाजगी नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे इ.१० वी चे सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांच्या सरासरीच्या आधारे इ. १० वीच्या ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चित करावेत. आणि<br>**ब.** विभागीय मंडळाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या भाषा व श्रेणी विषयांच्या मूल्यमापनासाठी निश्चित करुन दिलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत सदर विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील भाषा विषयांसाठी प्रत्यक्ष प्राप्त गुणांचे इ.१२ वीसाठी ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चित करावेत. याशिवाय मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार व यावर्षी दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित मूल्यमापनात तोंडी परीक्षेत प्राप्त झालेले गुण देण्यात यावेत तसेच श्रेणी विषयांत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे श्रेणी निश्चित करावी.<br>**क.** उपरोक्त कार्यवाही करुन भाषा विषय व श्रेणी विषयाची संपादणूक निश्चित करुन ठेवावी व अशा विद्यार्थ्यांनी ITI उत्तीर्ण झाल्यानंतर मंडळाकडे इ. १२ वीच्या समकक्षतेची मागणी केल्यानंतर उपरोक्त गुण/श्रेणी व ITI ची संपादणूक विचारात घेऊन गुणपत्रिका व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.<br>**ड.** सदर विद्यार्थ्यांसाठी संदर्भिय क्र.२ पत्रासोबत देण्यात आलेले परिशिष्ट क्र. जे आर ३.०८ वापरावे. |

| | | |
|---|---|---|
| | | ४.<br>अ ITI उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत भाषा विषयांसाठी पुनर्परिक्षार्थी (काही विषयांसाठी प्रविष्ट) विद्यार्थ्यांप्रमाणे इ.१० वी चे सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांच्या सरासरीच्या आधारे इ. १० वीच्या ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चित करावेत. आणि<br>ब. विभागीय मंडळाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून Transfer of Credit देण्यासाठी संबधित चार विषयांची (प्रत्येकी १०० पैकी) संपादणूक प्राप्त करुन घ्यावी. सदर संपादणूकीमध्ये लेखी व प्रात्यक्षिक /तत्सम इत्यादींची संपादणूक स्वतंत्रपणे असावी.<br>सदर चार विषयातील लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या सरासरीच्या आधारे भाषा विषयांसाठी इ. १२ वीसाठी निर्धारित ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चित करावे.<br>क. मंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार व यावर्षी दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित मूल्यमापनात तोंडी परीक्षेत प्राप्त झालेले गुण देण्यात यावेत तसेच श्रेणी विषयांत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे श्रेणी निश्चित करावी.<br>ड. या विद्यार्थ्यांसाठी संदर्भिय क्र. २ च्या पत्रासोबत दिलेले परिशिष्ट क्र. जे आर २.०९ वापरण्यात यावेत.<br>उपरोक्त कार्यवाही करुन भाषा विषय, ITI चे विषय व श्रेणी विषयाची संपादणूक निश्चित करुन विद्यार्थ्यांचा निकाल तयार करावा व त्याची एक प्रत राज्यमंडळ कार्यालयास सादर करावी. तसेच प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात.<br>५. ITI मध्ये प्रवेश घेण्यापूर्वी किंवा नंतर ITI अभ्यासक्रम सुरु असताना विद्यार्थी दोन भाषा, पर्यावरण शिक्षण (गुण/श्रेणी) व श्रेणी विषय उत्तीर्ण झाला असल्यास त्याला सदर विषयास प्रविष्ट होण्याची आवश्यकता नाही. सदर संपादणूक व ITI मधील विषयांची संपादणूक विचारात घेऊन निकाल तयार करण्यात येईल. त्यासाठी प्रचलित पध्दतीने दुरूस्ती पत्रकाव्दारे (CS) गणकयंत्र विभागास द्याव्यात. |

विभागीय मंडळ स्तरावर उपरोक्तप्रमाणे कार्यवाही दि.२६/०७/२०२१ ते दि.२८/०७/२०२१ या कालावधीत करावी. यासंदर्भात संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा लिखित सूचना निर्गमित करून, त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. याबाबतची सर्व दुरूस्तीपत्रके (CS) विभागीय मंडळाच्या गणकयंत्र विभागाकडे देऊन त्याबाबतच्या दुरुस्त्या राज्य मंडळाच्या गणकयंत्र विभागाकडे दि. २९/०७/२०२१ अखेर पाठवाव्यात. तसेच इ.१२ वी परीक्षा संदर्भातील साहित्य विभागीय मंडळाकडे जमा करण्यासाठी देण्यात आलेली दि. २३/०७/२०२१ पर्यंतची मुदत दि.२६/०७/२०२१ पर्यंत वाढविण्यात यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४